# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयुएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

---

## कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षा २०१८-१९

**(सविस्तर माहितीसाठी कृपया www.mcaer.org किंवा www.dtemaharashtra.gov.in/mhtcet2018 पहा)**

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, अधिसूचना दि.१५/१/२०१८ तसेच कृषी परिषदेचा ठराव क्र. ३७/९३/२०१७ ला अनुसरून महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत **कृषी, उद्यानविद्या, वनशास्त्र, सामाजिक विज्ञान, कृषी अभियांत्रिकी, अन्नतंत्र, जैवतंत्रज्ञान, मत्स्यविज्ञान, पशुसंवर्धन आणि कृषी व्यवसाय व्यवस्थापन हया दहा पदवी अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षात प्रवेशासाठी** सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून राज्य **सामायिक प्रवेश परीक्षा (MHT-CET) अनिवार्य आहे मात्र MHT-CET ऐवजी JEE / NEET / AIEEA-UG (भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणारी- All India Entrance Examination Test for Admission) यापैकी कोणतीही सामायिक प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्यात येईल.**

सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये (MHT-CET / JEE / NEET / AIEEA-UG) प्राप्त झालेल्या गुणांच्या **७० टक्के गुण** आणि पात्रता परीक्षेमध्ये (इ. १२ वी (विज्ञान) परीक्षेमध्ये) प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या **३० टक्के गुण** तसेच प्रचलित पध्दतीनुसार **इतर अधिभार** यांच्या आधारावर उमेदवाराची गुणवत्ता निश्चित करण्यात येईल.

राज्य **सामायिक प्रवेश परीक्षा (MHT-CET)** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून राबविण्यात येत असून याबाबतचे वेळापत्रक, माहिती पुस्तिका, प्रक्रिया याविषयी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून प्रसिध्द केलेले आहे. यानुसार राज्य सामायिक प्रवेश परीक्षेची प्रक्रिया दि.१८/१/२०१८ पासून सुरु झालेली असून सविस्तर वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी व प्रवेश अर्जाचे पुष्टीकरण | दि. १८/१/२०१८ ते २५/३/२०१८ |
| संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी व प्रवेश अर्जाचे पुष्टीकरण (रू. ५००/- अतिरिक्त विलंब शुल्कासह) | दि. २६/३/२०१८ ते ३१/३/२०१८ |

| | |
|---|---|
| उमेदवाराच्या लॉगइनद्वारे प्रवेश पत्र देणे | दि. २४/४/२०१८ ते १०/५/२०१८ |
| परीक्षेचा दिनांक | दि. १०/५/२०१८ (गुरुवार) |
| परीक्षेचे केंद्र | प्रवेश पत्रावर दर्शविल्याप्रमाणे |
| निकालाची घोषणा | दि. ३/६/२०१८ रोजी किंवा त्यापूर्वी. |

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी खालील विषयांची सामायिक प्रवेश परीक्षा देणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **पदवी अभ्यासक्रम** | **सामायिक प्रवेश परीक्षेसाठीचे आवश्यक विषय** |
|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** |
| १. | बी.एस्सी. (ऑनर्स) कृषी पदवी | भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (PCB) **किंवा** भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित (PCM) |
| २. | बी.एस्सी. (ऑनर्स) उद्यानविद्या पदवी | |
| ३. | बी. एस्सी. (ऑनर्स) सामाजिक विज्ञान पदवी | |
| ४. | बी. टेक. (जैव तंत्रज्ञान) पदवी | |
| ५. | बी. एससी. (ऑनर्स) कृषी व्यवसाय व्यवस्थापन पदवी | |
| ६. | बी.एफ्.एस्सी. (मत्स्य विज्ञान) पदवी | भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (PCB) |
| ७. | बी.एस्सी. (ऑनर्स) वनविद्या पदवी | |
| ८. | बी. एस्सी. (ऑनर्स) पशुसंवर्धन पदवी | |
| ९. | बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) पदवी | भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित (PCM) |
| १०. | बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान) पदवी | |

प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी www.dtemaharashtra.gov.in/mhtcet2018 या संकेतस्थळावर वरील आवश्यक ती सामायिक प्रवेश परीक्षा देण्याकरिता अर्ज दाखल करावेत.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/११८/१७४
दिनांक- २० जानेवारी,२०१८

**स्वाक्षरीत/-**
**महासंचालक**